शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव या संस्थेस यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : यंत्रख-२०२६/प्र.क्र.२९७/ई-१८००१७५/प्रशा-१,
गोकुलदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल,
९ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२६.

वाचा : आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक : DMER-२२०११/६३/२०२६-PROC१, दिनांक : १५.०६.२०२६.

शासन निर्णय :-

विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव या संस्थेतील विविध विभागांकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्य योजनेतर उपलब्ध अनुदानातून खालील तक्त्यात नमूद केलेली यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यास एकूण रुपये १,७१,१२,५००/- (अक्षरी एक कोटी एक्काहत्तर लक्ष बारा हजार पाचशे रुपये फक्त) (सर्व करांसहीत) इतक्या रक्कमेस या शासन निर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र	यंत्रसामुग्री / साधनसामुग्रीचे नाव	नग संख्या	प्रति नग किंमत	एकुण किंमत (करांसहित)
१	कलर प्रिंटर	४	५००००	२०००००
२	ऑल इन वन प्रिंटर	४	३५०००	१४००००
३	ऑल इन वन डेस्कटॉप कॉम्पुटर	८	१२५०००	१००००००
४	स्कॅनर विथ ट्रान्सपरन्सी ॲडॅप्टर एचपी स्कॅन जेट प्रो २००० एस२	३	५००००	१५००००
५	लॅपटॉप	२	९९०००	१९८०००
६	आरो वॉटर फिल्टर विथ कुलर	१	१७००००	१७००००
७	प्रोजेक्टर	१	९९५००	९९५००
८	बॉडी स्टोरेज टँक स्टिल	२	१५००००	३०००००
९	वॉर्मर	१	९८०००	९८०००
१०	मायक्रोकंट्रोल अल्ट्रासाउंड थेरपी मशिन	२	४२०००	८४०००
११	इंटरफ्युनशियल करंट थेरपी मशीन	२	६६०००	१३२०००
१२	सरव्हिकल/लुंबर ट्राक्शन युनीट	१	९१०००	९१०००
१३	टेन्स युनिट	२	३००००	६००००

१४	सीपीएम युनिट	१	६००००	६००००
१५	फ्रोझोन सेक्शन	१	९०००००	९०००००
१६	फुल्ली ॲटोमेटेड टीशु प्रोसेसर	१	३५००००	३५००००
१७	३ पार्ट सीबीसी	१	५०००००	५०००००
१८	इएसआर रिडर	१	७०००००	७०००००
१९	युरीन पॅरामिटर मशीन	१	१७५०००	१७५०००
२०	सायटोसेन्ट्रीफ्युज मशिन (मॉडेल-सायटोस्पिन-४)	१	७५००००	७५००००
२१	५ पार्ट सीबीसी	१	९९९०००	९९९०००
२२	एचपी लेसर जेट पी१०७ प्रिंटर फॉर इआरबीएम एच३६० मशिन	१	२५०००	२५०००
२३	फोटोकॉपीअर डिजीटल मशिन	१	२५००००	२५००००
२४	अडल्ट हाफ बॉडी मॅनिक्विन	१	५००००	५००००
२५	निअर व्हिजन चार्ट विथ डिफरंट लॅग्वेजेस	२	१०००	२०००
२६	कलर व्हिजन ओरिजनल इशिहारा	१	१०००	१०००
२७	नि हॅमर	१६	२००	३२००
२८	हिमोग्लोबिनोमिटर (इपोर्टेड)	१०	६०००	६००००
२९	बायफेसिक डिफीब्रिलेटर विथ एईडी विथ एक्सर्टनल पेसर	३	३१००००	९३००००
३०	मल्टीपॅरा मॉनिटर ७ पॅरा (हाय एड)	३	३२५०००	९७५०००
३१	सिरीज पंप	५	४८०००	२४००००
३२	अडल्ट सीपीआर मॅनिक्युन	३	५००००	१५००००
३३	बीएलएस (इसीजी ॲण्ड बॅग मास्क व्हेनटिलेशन)	३	१०००००	३०००००
३४	एइडी ट्रेनर मानिक्युन	१	२२००००	२२००००
३५	इटी ट्युब कफ प्रेशर मॅनोमिटर	५	६००००	३०००००
३६	मल्टीपॅरा मॉनिटर -५ पॅरामिटर (हाय एण्ड)	६	१५००००	९०००००
३७	एअर वार्मिग ब्लॅकेट सिस्टीम	२	३२५०००	६५००००
३८	एक्स-रे ह्यूअर	२	१८०००	३६०००
३९	१२ चॅनल इसीजी मशिन	२	२१००००	४२००००
४०	स्पायरोमिटर ऑडनरी	२	१०००००	२०००००
४१	डिजिटल बीपी ॲपरॅटस	१०	३५००	३५०००
४२	हाईट मेझरींग स्टॅड (हाय एड)	१	२८००	२८००
४३	वेईंग मशिन अडल्ट मेक (हाय एड)	१	२५००	२५००
४४	नेबुलायझर (इलेक्ट्रीक)	५	२८००	१४०००

४५	स्टॅण्ड माउंटेड विथ व्हिल मक्युरी स्पिगमोमॅनोमिटर	५	११०००	५५०००
४६	पेशंट एक्सामिनेशन टेबल	२	२२०००	४४०००
४७	अडल्ट सेंट्रल लाईन ट्रेनिंग मॉडेल	२	२०००००	४०००००
४८	पर्क्यूटेनियस ट्रेकीओस्टोमी सेट (मेडियम एंड)	१	१८०००	१८०००
४९	क्रॅश कार्ट	३	३५०००	१०५०००
५०	रेडियंट रूम हिटर	५	१५००००	७५००००
५१	मॅक्झीलरी अँड मॅन्डीबुलार एक्सट्राक्श्न फोरसेप अँड इलाव्हेटर	५	३५०००	१७५०००
५२	डेंटल इलाव्हेटर सेट	२	१८०००	३६०००
५३	ड्राय हिट स्टरलायझर्स	१	५००००	५००००
५४	एलईडी स्मार्ट टीव्ही ५५" इंच	१	६००००	६००००
५५	ईलेक्ट्रोलाईट मशीन	१	१९००००	१९००००
५६	मल्टी फंक्शन लेझर जेट कलर प्रिंटर +स्कॅनर	१	५००००	५००००
५७	डिजीटल माक्रोस्कोप कॅमेरा	१	४५०००	४५०००
५८	सीसीटीव्ही कॅमेरा	३२	१२५००	४०००००
५९	रिडर युनिट (प्रायमा टी डिजीटालाईज)	१	८०००००	८०००००
६०	प्रायमा कनसोल युनिट इन्क्यूडिंग १७ टीएफटी मॉनिटर ॲन्ड किबोर्ड विथ वर्कस्टेशन सॉफटवेअर	१	२०००००	२०००००
६१	कॅशेट टाईप सीसी विथ एसटी.VI इमेजिंग प्लेटस साईज १४ X १७	१	३५०००	३५०००
६२	युपीएस ३केव्हिए	२	१०००००	२०००००
६३	फुजी ड्राय लेझर इमॅजर ड्राय पिक्स स्मार्ट प्रिंटर विथ टू साईज ऑनलाईन फिल्म पॅकेट ०८ X १०	१	५५००००	५५००००
६४	अडल्ट लॅरिंगोस्कोप सेट	२	५०००	१००००
६५	व्हॅकीन कॅरीअर	१	५५००	५५००
६६	सिलीकॉन सक्शन टयूबिंग लॉंग	१०	११००	११०००
	एकूण (अक्षरी एक कोटी एक्काहत्तर लक्ष बारा हजार पाचशे रुपये फक्त)			**१,७१,१२,५००/-**

अटी :-

१) सदर प्रशासकीय मान्यता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्य योजनेतर मंजूर व उपलब्ध निधीच्या अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

२) सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ व इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग‍ाने त्यांचेकडील याबाबत निर्गमित केलेल्या अनुषांगिक शासन निर्णयांमध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

३) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावेत. सदर दर हे बाजारभावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने याबाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबतची खातरजमा आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

४) सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे (Technical specification) व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार साधनपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची असावीत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल, अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात आल्यानंतरच सदर बाबींची खरेदी प्रक्रिया करण्यात यावी.

५) प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भूत केलेला नसल्याबाबत/खरेदीची व्दिरुक्ती होणार नाही व सदर साधनसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) व संबंधित अधिष्ठाता यांनी खात्री करावी.

६) सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

८) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

९) सदर यंत्रसामुग्रीचा व साधनसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ च्या खरेदी धोरणातील तरतूदीनुसार अथवा शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक संकिर्ण २०१४/प्र.क्र.२१५/उद्योग-४, दिनांक २४.०८.२०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवरुन ज्यांचे दर कमी असतील त्याप्रमाणे विहित कार्यपद्धती राबवून करण्यात यावी.

१०) उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे राज्यस्तरीय खरेदी समितीने अनुपालन करावे.

२. या प्रयोजनासाठी येणारा खर्च संबंधित संस्थेस पुढील लेखाशीर्षातंर्गत मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्र. एस १

२२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च
१०५	-	वैद्यकीय शिक्षण व संशोधन
(०३)(३१)	-	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव
५२	-	यंत्रसामुग्री व साधनसामुग्री (२२१० जी ३३१)

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/ विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग-२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८३११२०६४३२२५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUDHIR JAYA SHETTY

Digitally signed by SUDHIR JAYA SHETTY
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E9D37D499A521B728AEB3DC8EC38B759420308B9FD7816002B4AF0FFBF1111D7, cn=SUDHIR JAYA SHETTY
Date: 2026.08.31 19:20:14 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखाकार- १/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
३) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव
५) जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव
६) निवडनस्ती (प्रशा-१)